
साप्ताहिक


# विवेक

२ सप्टेंबर २०१८ ते ८ सप्टेंबर २०१८, ₹ १५/-
एकूण पृष्ठसंख्या ४४



# 'भारतरत्न'

## रग रग हिन्दू मेरा परिचय




# भारतमातेच्या मुकुटात जडवलेली नवरत्ने!

**अटलजींनी आपल्या परमप्रिय भारतमातेच्या मुकुटात आर्थिक व सामाजिक परिवर्तनाची ८ अनमोल रत्ने जडवून साऱ्या विश्वात तिची शान वाढविली आहे. अजातशत्रू, सत्त्वशील, आत्मसंयमी, स्थितप्रज्ञ आणि समर्पित देशभक्त असलेले विश्वपुरुष भारताचे लाडके माजी पंतप्रधान, भारतरत्न श्रद्धेय अटलबिहारीजी वाजपेयी यांनी १५ ऑगस्टला भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या ७१व्या सोहळ्यात उत्तुंग चढलेल्या तिरंगी राष्ट्रध्वजाचा मान राखून १६ ऑगस्टला मातृभूमीच्या कुशीत वयाच्या ९३व्या वर्षी चिरनिद्रा घेतली. याबद्दल जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष अशोक जैन यांनी 'साप्ताहिक विवेक'च्या वाचकांसाठी व्यक्त केलेल्या भावना...**

अटलजी - जमिनीवर पाय असलेले विसाव्या शतकातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व!

श्रद्धेय अटलजींबद्दल माझ्या मनात नेहमीच आदराचे स्थान राहिलेले आहे. त्यांच्याबद्दल सांगायचे, तर जमिनीवरच पाय असलेले विसाव्या शतकातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व आणि धोरणी राजकारणी होते. माणसाच्या माणुसकीबद्दल अटलजी स्वत:च आपल्या कवितेत किती स्पष्ट आणि समर्पकपणे मांडतात -

*मेरे प्रभु!*
*मुझे इतनी ऊँचाई कभी मत देना,*
*गैरों को गले न लगा सकूँ,*
*इतनी रुखाई कभी मत देना।*

श्रद्धेय अटलींचा माझ्या आयुष्यात तसा तीन वेळा थेट संबंध आलेला आहे. मी शालेय विद्यार्थी असताना जळगावच्या जुन्या कॉटन मार्केट परिसरात झालेली त्यांची पहिली जाहीर सभा ऐकली. त्यानंतर महाविद्यालयात विद्यार्थी असता ना जी.एस. मैदानावर दुसरी जाहीर सभा ऐकली होती. या सभांमध्ये अटलजी काय म्हणाले? ते आज शब्दश: आठवत नाही. पण एका चांगल्या वक्त्याचे भाषण ऐकण्यासाठी आपल्याला जायचे आहे, हाच हेतू मनात ठेवून अटलजींचे विचार तेव्हा ऐकले होते. अटलजींचे भाषण ऐकणे हासुद्धा एक संस्कार होता. अटलजी बोलतात कसे? भाषाशैली कशी आहे आणि शब्दांचा नेमकेपणाने वापर कसा करतात? संदर्भ कसे देतात? अटलजींची देहबोली कशी आहे, कुठे कसे धीर गंभीर होतात? याचे प्रचंड आकर्षण तेव्हा आमच्या युवा पिढीला होते.

**अटलजींच्या हस्ते भवरलालजी जैन यांचा गौरव**

अटलजींची तिसरी आठवण ही आमचे पिताश्री श्रद्धेय भवरलालजी जैन उर्फ मोठे भाऊ यांच्या एका छोट्या समाजकार्याशी संबंधित आहे. गुजरातमधील भयंकर भूकंपात भूज परिसर उद्ध्वस्त झाला होता. तेथे मुलामुलींच्या शाळांचे पुनर्निमाण करण्याचे कार्य अखिल भारतीय जैन संघटनेने सुरू केले होते. जवळपास ७०० शाळांचे बांधकाम करताना तेथे पीव्हीसी शीट पुरविण्याचे काम जैन उद्योग समूहाने केले होते. या कार्याची दखल घेऊन तेव्हाच्या गुजरात सरकारने २००१मध्ये पंतप्रधानपदी असलेल्या माननीय अटलजींच्या हस्ते श्रद्धेय मोठे भाऊंचा सत्कार केला होता.

अटलजींच्या हस्ते झालेला वडिलांचा सत्कार आमच्या सगळ्यांसाठी अभिमानाचा मानतो. समाजासाठी अधिक दृढतेने बांधिलकीच्या नात्याने कार्य करण्याची जबाबदारी श्रद्धेय भवरलालजी पार पाडत राहिले. आज आम्ही चारही भावंडे तर हे कार्य पुढे नेत आहोतच, तसेच त्यांच्या नातवंडांच्या रूपाने तिसरी पिढीसुद्धा सामाजिक व समूहकार्याचा वसा घेऊन शक्य होईल ते कार्य करण्यासाठी कटिबद्ध झालेली आहे.

**भारतमातेच्या मुकुटातील नवरत्ने**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर तेव्हाच्या पहिल्या सरकारने देशांतर्गत औद्योगिकीकरणाला चालना दिली. नंतरच्या सरकारनेदेखील आपापल्या परीने पुढे कार्य सुरू ठेवले. १९९१ ते ९६मध्ये नरसिंह राव पंतप्रधान आणि डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री असताना 'खाउजा'चे - अर्थात खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. मागील सरकारची ध्येयधोरणे त्यांनी पुढेही सुरू ठेवली. औद्योगिकीकरणाची दुसरी क्रांती ही अटलजींच्या पंतप्रधानपदाच्या काळात झाली. अटलजींनी औद्योगिक धोरणात बदल केले. त्याची अंमलबजावणी केली व भारताला इतरांच्या तुलनेत बरोबरीला आणले. अटलजी पंतप्रधान असताना दूरसंचार, ऊर्जा, फायनान्स, विमा, कृषी, शिक्षण आणि रस्त्यांच्या पायाभूत सुविधा अशा क्षेत्रांत अनेक उत्तम निर्णय झाले. संपूर्ण भारताला रस्त्याच्या जाळ्यांतून एकत्र जोडण्याची कल्पना अटलजींनी मांडली होती. आज भारतातील कोणत्याही




गुजरातमधील भूज येथील भूकंप मदतकार्यात केलेल्या कार्याबद्दल श्रद्धेय भवरलालजी जैन यांचा हृद्य सत्कार करताना तत्कालीन पंतप्रधान माननीय अटलबिहारी वाजपेयी. शेजारी भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्णजी अडवाणी, गुजरातचे मुख्यमंत्री केशुभाई पटेल आणि भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष शांतिलालजी मुथ्था (२००१ संग्रहित छायाचित्र)


राज्यातील कानाकोपऱ्यात आपण वाहनाने केव्हाही जाऊ शकतो.

देशातील मान्यवर उद्योजकांशी पंतप्रधानांचे मैत्रिपूर्ण संबंध असतात, हे जाहीरपणे स्वीकारण्याचे धाडस अटलजींनी दाखविले. त्यापूर्वी सत्ताधारी मंडळींच्या राजकीय व्यासपीठावर उद्योजक सहसा प्रवेश करीत नसत. तशी एक अलिखित मर्यादा होती. मात्र, भारतातील औद्योगिक धोरणांमधील बदल घडवून आणताना अटलजींनी पिरामल ग्रूपचे चेअरमन अजय पिरामल यांना एका समितीच्या अध्यक्षपदी नेमून नवा पायंडा पाडला होता.

'माणसामाणसाला सबल करणं म्हणजे पर्यायाने देशालाच सबल करणं होय. सबलीकरणाचा साधा, सरळ मार्ग म्हणजे आर्थिक उन्नती करून त्याला सामाजिकदृष्ट्या जोडणं होय' असे श्रद्धेय अटलजी म्हणत असत. त्यांनी देशाची निव्वळ आर्थिक उन्नतीच साधली असे नाही, तर समाजातील तळागाळातील वर्गाच्या प्रगतीसाठी नवनवे सामाजिक परिवर्तनशील मार्गही अवलंबले. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी ९ महत्त्वाच्या गोष्टींना प्राथमिकता दिली. या बाबींना मी भारतरत्न अटलजींनी भारतमातेच्या मुकुटात जडवलेली 'नवरत्ने' असेच म्हणतो...

**पहिले रत्न - सकल राष्ट्रीय वार्षिक उत्पन्नात (जी.डी.पी.मध्ये) वाढ**

भारताचे पंतप्रधान असताना अटलजींनी देशाच्या अर्थनीतीत क्रांतिकारक सुधारणा केल्या. त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत (१९९८-२००४) भारताचा जी.डी.पी. सातत्याने ८% राहिला आणि चलनफुगवटा ४% कमी झाला.



**अशोक जैन**

त्यांच्या याच कार्यकालात आलेला भूकंप (२००१), दोन चक्रीवादळे (१९९९ आणि २०००), भयंकर दुष्काळ (२००२-०३), तेल टंचाई (२००३), कारगिल युद्ध आणि लोकसभेवरील दहशतवादी हल्ला अशा अनेक भयानक राष्ट्रीय संकटांचा कणखरपणे प्रतिकार करून अटलजींनी अर्थकारणाचे संतुलन खंबीरपणे टिकवून ठेवले.

**दुसरे रत्न - आर्थिक जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्याचे (फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी अँड बजेट मॅनेजमेंट ॲक्टचे) प्रवर्तन**

अटलजींनी प्रवर्तित केलेल्या या नवीन अधिनियमामुळे राष्ट्रीय अर्थसंकल्पांतील वित्तीय तूट कमी होऊन सार्वजनिक क्षेत्रातील बचत वाढवण्यात मोलाचा हातभार लागला.

**तिसरे रत्न - खाजगीकरण**

अटलजींच्या या चाणाक्ष नीतीमुळे भारतातील खाजगी व्यवसायांतील व उद्योगातील सरकारी हस्तक्षेप कमी होऊन त्यांची वेगाने भरभराट होऊ लागली. त्याच्याही पुढे जाऊन त्यांनी निर्गुंतवणूक मंत्रालय (डिसइन्वेस्टमेंट मिनिस्ट्री) प्रस्थापित केली. त्यातील सर्वात महत्त्वाच्या निर्गुंतवणुकी होत्या - भारत ॲल्युमिनियम कंपनी (बाल्को), हिंदुस्तान झिंक, इंडियन पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (आय.पी.सी.एल.) आणि व्ही.एस.एन.एल!

**चौथे रत्न - भारतीय दूरसंचार (टेलिकॉम) उद्योग**

वाजपेयी सरकारने नवीन दूरसंचार नीतीद्वारे राजस्व सामायिकीकरणाचा (रेव्हेन्यू शेअरिंगचा) एक नवीन परिपाठ घालून दिला, ज्यामुळे दूरसंचार क्षेत्राशी संबंधित उद्योगधंद्यांना निर्धारित परवाना शुल्काच्या जाचापासून मुक्ती मिळाली.

भारत संचार निगम या स्वतंत्र संस्थेची निर्मिती करून दूरसंचारसंबंधित नीती आणि सेवांचे सुयोग्य व्यवस्थापन सुरू केले. दूरसंचार क्षेत्राची याहूनही अधिक उन्नती करण्यासाठी श्रद्धेय अटलजींनी दूरसंचार विवाद निवारण अपिलीय न्यायाधिकरण (टेलिकॉम डिस्प्यूट सेटलमेंट अपिलेट ट्रिब्यूनल) निर्माण केले व विदेश संचार निगम ही आंतरराष्ट्रीय दूरध्वनी सेवा बरखास्त केली.

**पाचवे रत्न - शैक्षणिक नीती**

अटलजींनी २००१मध्ये सुरू केलेल्या या नीतीने भारताच्या शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणले. या नीतीद्वारे ६-१४ या वयोगटातील मुलांना भारतात प्रथमच प्राथमिक शिक्षण विनामूल्य उपलब्ध करण्यात आले.

**सहावे रत्न - वैश्विक संबंध मजबूत केले**

श्रद्धेय अटलजींच्या कार्यकालात भारत-चीन यांच्यामधील सीमावाद कमी झाले आणि व्यापारसंबंध सुधारले. त्यांनी सन २०००मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांना भारतभेटीचे निमंत्रण देऊन भारत-अमेरिका यांच्यामधील शीतयुद्ध संपवून द्विपक्षीय संबंध सुधारले. त्याचप्रमाणे त्या वेळचे पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांनाही २००१मध्ये १४-१६ जुलै रोजी आयोजित केलेला दोन दिवसीय 'आग्रा समिट'साठी पाचारण करून काश्मीर सीमेवरील दहशतवादी कारवायांवर चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्नही केला. कविहृदयाच्या अटलजींनी १९

फेब्रुवारी १९९९ रोजी दिल्ली-लाहोर या बस वाहतूक सेवेला हिरवा झेंडा दाखवून भारतीय सहिष्णुतेचा व माणुसकीचा हृदयस्पर्शी प्रत्ययही साऱ्या विश्वाला घडविला.

**सातवे रत्न - वैज्ञानिक संशोधनास प्रोत्साहन**

भारताच्या ५६व्या स्वातंत्र्यदिनी श्रद्धेय वाजपेयीजी 'चांद्रयान-१' या प्रकल्पास मंजुरी देताना म्हणाले, ''आपला भारत आता वैज्ञानिक क्षेत्रातही भव्य भरारी घेण्यास सिद्ध झाला आहे. सन २००८पर्यंत भारताचे स्वत:चे अंतराळयान चंद्राकडे झेप घेईल, हे घोषित करताना मला अत्यंत आनंद होत आहे.''

अटलजींनी भारताला अण्वस्त्रसिद्ध राष्ट्र होण्याचा बहुमानही मिळवून दिला. १९९८मध्ये एकाच आठवड्यात ५ अणुचाचण्या करण्याचा विक्रम भारतमातेच्या मुकुटावर जडवताना ते म्हणाले, ''महासंहारक बाँब बनविण्याची क्षमता आता आमच्यामध्येही आहे, तरीही इतरांवर आक्रमण करण्यासाठी या शस्त्रास्त्रांचा उपयोग आम्ही कधीच करणार नाही!''

**आठवे रत्न - पायाभूत सुविधांची निर्मिती**

'सुवर्ण चतुष्कोन' (गोल्डन क्वाड्रँगल) आणि 'प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना' या दोन अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना अटलजींनीच सुरू केल्या. गोल्डन क्वाड्रँगल या योजनेद्वारे चेन्नई, कोलकाता, दिल्ली आणि मुंबई ही महानगरे चार महामार्गांनी थेट जोडून वाहतूक अत्यंत सुगम आणि वेगवान केली. प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेद्वारे सर्व प्रकारच्या हवामानात टिकून राहतील अशा रस्त्यांच्या जाळ्याद्वारे भारतभर विखुरलेली दूरदूरची खेडी एकमेकांशी जोडली गेली.

**नववे रत्न - भारतरत्न अटलबिहारी वाजपेयीजी!**

ही अष्टरत्ने भारतमातेच्या मुकुटात जडविणारे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयीजी हे स्वत:ही एक अलौकिक रत्नच असल्यामुळे भारतमातेच्या मुकुटात दिमाखाने मिरविणारी ही झगमगती नवरत्नेच आहेत, असे म्हटले पाहिजे.

अटलजींसारखा शतक व्यापून टाकणारा नेता अलीकडे होणे शक्य नाही. माणसे कितीही मोठी झाली, तरी त्यांचे पाय जमिनीवर हवेत आणि त्यांचा संपर्क सर्वसामान्य माणसाशी हवा असा विचार करणाऱ्या अटलजींनी तीन वेळा भारताच्या पंतप्रधानपदाची धुरा सांभाळली. अटल राजकारणातून ते हळूहळू बाजूला झाले. परंतु सर्वसमान्यांच्या मनात उत्तुंग उंची कायम राहिली. अशा महनीय व्यक्तिमत्त्वाला हृदयपूर्वक श्रद्धांजली. त्यांच्या पवित्र स्मृतींना वंदन!!!


**लेखक जैन इरिगेशन, जळगावचे अध्यक्ष आहेत.**

(संदर्भ - या लेखासाठी वृत्तपत्रे, सोशल मीडियाच्या माहितीचा आधार घेतला आहे.)

**ashok@jains.com**

वि


बाधाएं आती हैं आएं
घिरें प्रलय की घोर घटाएं
पांवों के नीचे अंगारे
सिर पर बरसें यदि ज्वालाएं
निज हाथों में हंसते-हंसते
आग लगाकर जलना होगा
कदम मिलाकर चलना होगा
- अटल बिहारी वाजपेयी




भारतरत्न अटलजींना भावपूर्ण श्रद्धांजली



श्रावण शंकरराव पा. भिलवंडे
माजी सभापती - पचायत समिती, नायगांव
महाराष्ट्र प्रदेश कार्यकारीणी सदस्य - भाजपा

नंदनंदन निवास, शामनगर, नरसी, ता. नायगांव,
जि. नांदेड ●भ्रमणध्वनी : ९४२२१७०८५८



क्या हार में, क्या जीत में
किंचित नहीं भयभीत मैं
कर्त्तव्य पथ पर जो भी मिला
यह भी सही वो भी सही
वरदान नहीं मांगूंगा
हो कुछ पर हार नहीं मानूंगा
- अटल बिहारी वाजपेयी

भारतरत्न अटलजींना भावपूर्ण श्रद्धांजली



ॲड. चैतन्य बापू देशमुख
महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य

मे. बाबा पेट्रोल पंप
कापूस संशोधन केंद्रासमोर, हैदराबाद रोड,
नांदेड-४३१६०४ ● दूरध्वनी : ०२४६२-२५८०११